आदेश क्र. -४८

क्र.उसं/आस्थापना/ना.से.मं.२/२०१६/ B- 7267
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : 24 MAY 2016

**विषय :संचालनालयातील गट ब (राजपत्रित/अराजपत्रित) व गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ (२) स्थापन करण्याबाबत.**

संदर्भ :१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/ १२, दि.३१.०१.२०१४.
२) उद्योग संचालनालय, आदेश क्र. उसं/आस्थापना/ना.से.मं (२)/२०१४/अे-५२१ दिनांक ०५.०५.२०१४.
३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.ईएसटी-३४१५/प्र.क्र.०१/२०१५ उद्योग-३, दिनांक ०५.०५.२०१५.

**<u>प्रस्तावना:-</u>**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ १ च्या शासन निर्णयामधील सुचनेनुसार, मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) क्र.८२/२०११ मध्ये दिनांक ३१.१०.२०१३ रोजी दिलेल्या निदेशाचे पालन करण्यासाठी उद्योग संचालनालयाच्या सेवेतील गट ब मधील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या तसेच गट ब (अराजपत्रित) संवर्गातील स्वीय सहाय्यक व गट क संवर्गातील उद्योग निरीक्षक (उच्च श्रेणी/कनिष्ठ श्रेणी), अधिक्षक, लघुलेखक (उच्च श्रेणी /कनिष्ठ श्रेणी.), शाखा प्रमुख, टिप्पणी सहाय्यक, ग्रंथपाल, प्रमुख टंकलेखक, रोखपाल,लिपिक, टंकलेखक, लिपिक टंकलेखक, लघुटंकलेखक, वरिष्ठ लिपिक (सांख्यिकी) व वाहनचालक यांच्या पदस्थापना व बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ (२) स्थापन करण्याबाबत निर्देशित केले आहे.

**<u>आदेश :-</u>**

उद्योग संचालनालयातील गट ब (राजपत्रित) संवर्गातील उद्योग अधिकारी, गट ब (अराजपत्रित) संवर्गातील स्वीय सहाय्यक, गट क संवर्गाच्या आंतरविभागीय विनंती बदल्या, गट क संवर्गातील राज्यस्तरीय उद्योग निरीक्षक (उच्च श्रेणी, कनिष्ठ श्रेणी), राज्यस्तरीय अधिक्षक व गट क संवर्गातील इतर सर्व पदे यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी खालीलप्रमाणे नागरी सेवा मंडळ (२) ची स्थापना करण्यात येत आहे.

**नागरी सेवा मंडळ (२-अ)**

| | | |
|---|---|---|
| १. | विकास आयुक्त (उद्योग) | अध्यक्ष |
| २. | अतिरिक्त उद्योग संचालक | सदस्य |
| .३ | उद्योग सह संचालक (आस्थापना) [अतिरिक्त उद्योग संचालक नसल्यास] | सदस्य |
| ४. | उद्योग उप संचालक (आस्थापना-१) | सदस्य |

जेव्हा सक्षम प्राधिकारी प्रधान सचिव (उद्योग) असतील तेव्हा नागरी सेवा मंडळ (२ –अ) कार्यरत राहील.

**नागरी सेवा मंडळ (२-ब)**

| | | |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त उद्योग संचालक | अध्यक्ष |
| २. | उद्योग उप संचालक (आस्थापना-१) | सदस्य |
| ३ | उद्योग अधिकारी (आस्थापना) | सदस्य |

जेव्हा सक्षम प्राधिकारी विकास आयुक्त (उद्योग) असतील तेव्हा नागरी सेवा मंडळ (२-ब ) कार्यरत राहिल.

**नागरी सेवा मंडळ (२-क)**

| | | |
|---|---|---|
| १. | उद्योग उप संचालक (विभागीय कार्यालय) | अध्यक्ष |
| २. | संबंधित विभागातील ज्येष्ठ महाव्यवस्थापक | सदस्य |
| ३ | उद्योग उप संचालक (आस्थापना-१), उद्योग संचालनालय, मुख्यालय, मुंबई. | सदस्य |

जेव्हा सक्षम प्राधिकारी विभागीय उद्योग सह संचालक असतील तेव्हा नागरी सेवा मंडळ (२-क ) कार्यरत राहिल.

नागरी सेवा मंडळ (२-अ), (२-ब) व (२-क) सदर कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून अस्तित्वात येईल. नागरी सेवा मंडळ (२) बाबतचे संचालनालयाचे उपरोक्त संदर्भ (२) चे आदेश या आदेशान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

सदर कार्यालयीन आदेश संचालनालयाच्या www.industry.maharshtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

**मा.विकास आयुक्त (उद्योग)**
**यांचे मान्यतेने**

अतिरिक्त उद्योग संचालक

प्रत अग्रेषित :

मा.प्रधान सचिव (उद्योग) ,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर :

१) अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई-४०० ०३२.

२) उपसचिव / कक्ष अधिकारी (उद्योग-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

३) उद्योग सह संचालक, मुख्यालय/ मु.प्रा.वि.मुंबई/ ठाणे/ पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/ अमरावती

४) विशेष कार्य अधिकारी , मुख्यालय, मुंबई

५) अधिक्षकीय उद्योग अधिकारी , मुख्यालय, मुंबई / उपविभागीय कार्यालय, नांदेड.

६) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (सर्व)

७) उद्योग उप संचालक, मुख्यालय, मुंबई (सर्व)

F:\ \datao\datao\Gadekar\नागरी सेवा मंडळ स्थापनेबाबत.docx

८) सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), मुख्यालय, मुंबई.

९) लेखाअधिकारी, मुख्यालय, मुंबई.

१०) उद्योग अधिकारी (सर्व), मुख्यालय, मुंबई.

११) आस्थापना शाखा, सर्व कक्ष, मुख्यालय, मुंबई.

१२) आदेश नस्ती, मुख्यालय, मुंबई.